उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : २४ जुलै, २०१९

किमान वेतन अधिनियम १९४८

अधिसूचना

क्रमांक. किवेअ-१०१५/४१८/प्र.क्र.१४०/कामगार-७.- ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यातील "कोणत्याही दुकानातील किंवा व्यापारी आस्थापनेतील कामधंदा" (कोणत्याही बँकेतील कामधंदा किंवा अनुसूचितील नोंदीपैकी कोणत्याही नोंदीत जो समाविष्ट असेल असा कामधंदा वगळून) या रोजगारात असलेल्या (यात यापुढे ज्याचा "उक्त अनुसूचित रोजगार" असा उल्लेख करण्यात आलेला आहे) कामगारांना देय असलेले किमान वेतन दर शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक. किवेअ -५२०१० / प्र.क्र. १३१४ / काम-७, दिनांक २८.९.२०१० अन्वये पुनर्निर्धारित केले आहेत,

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने पुनर्विलोकन करुन उक्त अनूसूचित रोजगारातील कामगारांना देय असलेले किमान वेतन दर पुनर्निर्धारित करण्याचे ठरविले आहे.

त्याअर्थी, आता किमान वेतन अधिनियम, १९४८ (१९४८ चा ११) हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्याच्या कलम ३ च्या पोटकलम (१) चा खंड (ब) आणि कलम ५ च्या पोट-कलम (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन, शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक. किवेअ-१०१५/ ४१८/प्र.क्र.१४०/कामगार-७., दिनांक २८ ऑक्टोबर, २०१६ मध्ये प्रसिध्द झालेल्या प्रस्तावाच्या संबंधात मिळालेली सर्व अभिवेदने विचारात घेतल्यानंतर आणि सल्लागार मंडळाचा सल्ला विचारात घेतल्यानंतर महाराष्ट्र शासन याद्वारे दिनांक २४ जुलै,२०१९ .पासून उक्त अनुसूचित रोजगारात नोकरीत असलेल्या खालील अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या कामगारांच्या वर्गाला त्या अनूसूचीच्या स्तंभ (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे वेतनाचे किमान दर पुनर्निधारित करीत आहे.:-

अनुसूची

| अ.क्र. | कामगारांची वर्गवारी | मूळ किमान वेतन दर (दरमहा रुपये) | | |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | |
| | | परिमंडळ-१ | परिमंडळ-२ | परिमंडळ-३ |
| १ | कुशल | ११,६३२/- | ११,०३६/- | १०,४४०/- |
| २ | अर्धकुशल | १०,८५६/- | १०,२६०/- | ९,६६४/- |
| ३ | अकुशल | १०,०२१/- | ९,४२५/- | ८,८२८/- |



Scanned by CamScanner

स्पष्टीकरण- या अधिसूचनेच्या प्रयोजनार्थ-

क. परिमंडळ १ - महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका हद्दीतील सर्व क्षेत्र तसेच महानगरपालिका क्षेत्रांपासून २० किलोमीटर पर्यन्तचे औद्योगिक क्षेत्र / छावणी क्षेत्रांचे मिळून होईल;

ख. परिमंडळ २- महाराष्ट्र शासनाच्या सर्व वर्ग नगरपरिषदा क्षेत्रांचे मिळून होईल.

ग. परिमंडळ ३- परिमंडळ एक व परिमंडळ दोन वगळून महाराष्ट्र राज्याच्या उर्वरित क्षेत्रांचे मिळून होईल.

घ. रोजंदारीवर काम करणा-या कामगारांस देय असलेले मजूरीचे किमान दर तो कामगार ज्या वर्गाचा असेल, त्या वर्गासाठी निश्चित करण्यात आलेल्या मासिक मजूरीच्या दरांना २६ ने भागून येणारा भागाकार नजिकच्या पैशांपर्यंत पूर्णांकात करुन काढण्यात येईल;

च. अर्धवेळ काम करणा-या कामगारांना देय असलेल्या प्रतितास किमान वेतनाचा दर तो कामगार ज्या वर्गवारीचा असेल, त्या वर्गवारीच्या रोजंदारी किमान वेतनास ८ (तास) ने भागून व त्यात १५% वाढ करुन तसेच येणारी रक्कम नजिकच्या पैशापर्यंत पूर्णांकात परिवर्तित करण्यात येऊन काढण्यात येईल;

छ. किमान वेतन दरामध्ये साप्ताहिक सुट्टीच्या वेतनाचा समावेश असेल;

ज. किमान वेतन दरामध्ये मूळ वेतन दर, विशेष भत्ता आणि सवलती असल्यास त्याचे रोख मूल्य यासाठी अनुज्ञेय असलेल्या सर्व दरांचा समावेश असेल;

झ. कुशल कामगार म्हणजे जो स्वत:च्या निर्णय शक्तीनुसार आपले काम कार्यक्षमतेने व जबाबदारीने पार पाडू शकतो असा कामगार;

ट. अर्धकुशल कामगार म्हणजे सर्वसाधारणपणे नित्याच्या स्वरुपाचे असे काम करतो की, ज्यामध्ये निर्णय घेण्याची फारशी गरज नसते. परंतु तुलनेने त्याला दिलेले छोटेसे काम की, ज्यामध्ये महत्वाचे निर्णय इतरांकडून घेतले जातात असे काम योग्य रितीने पार पाडण्याची आवश्यकता असते. मर्यादित व्याप्तीचे नित्याचे काम पार पाडणे हेच त्याचे कर्तव्य असते;

ठ. अकुशल कामगार म्हणजे ज्यास लहानसा किंवा स्वतंत्र निर्णय घेणे आणि पूर्वानुभव असणे आवश्यक नाही. परंतु तरीही व्यावसायिक परिस्थितीची माहिती असणे आवश्यक आहे असे साध्या कर्तव्य पालनाचा अंतर्भाव असलेले काम करणारा कामगार, त्याच्या कामासाठी शारीरिक परिश्रमाशिवाय निरनिराळ्या वस्तूंची किंवा मालाची त्याला चांगली माहिती असणे आवश्यक असेल.



Scanned by CamScanner

परिशिष्ट

महाराष्ट्र राज्यातील १० केंद्रांचा सरासरी ग्राहक मूल्य निर्देशांक (नवीन मालिका २००१=१००) हा उक्त अनुसूचीत रोजगारात नोकरी करत असलेल्या कामगारांना राहणीमान निर्देशांक असेल. महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेला सक्षम प्राधिकारी १ जानेवारी व १ जुलै रोजी सुरु होणा-या प्रत्येक सहामाहीच्या समाप्तीनंतर, त्या सहा महिन्यासाठी उक्त कर्मचा-यांना लागू असलेल्या राहणीमान निर्देशांकाची सरासरी काढील आणि ३२९ निर्देशांकावर अशा प्रत्येक अंकाच्या वाढीसाठी ज्या सहामाहीच्या संबंधात अशी सरासरी काढण्यात आलेली असेल, त्या सहा महिन्यालगत पुढील सहामाहीसाठी उक्त कर्मचा-यांना देय असलेला विशेष भत्ता ( यात यानंतर ज्याचा "राहणीमान भत्ता" असा निर्देश करण्यात आला आहे.) सर्व परिमंडळाच्या संबंधित दरमहा रुपये २६ दराने असेल.

२. सक्षम प्राधिकारी, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, उपरोक्त प्रमाणे हिशेब करुन काढलेला राहणीमान भत्ता, जानेवारी ते जून या कालावधीतील प्रत्येक महिन्यासाठी देय असेल, तेव्हा जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवडयामध्ये आणि जुलै ते डिसेंबर या कालावधीमधील प्रत्येक महिन्यासाठी देय असेल, तेव्हा जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवडयामध्ये जाहीर करील:

परंतु सक्षम प्राधिकारी, किमान वेतन निश्चित केल्याच्या दिनांकापासून देय असलेला राहणीमान भत्ता जून किंवा डिसेंबर अखेरपर्यन्तच्या किंवा यथास्थिती, किमान वेतन दर निश्चित करण्यात आल्याच्या दिनांकानंतर लगेचच जाहीर करील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(श. मा. साठे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

Scanned by CamScanner